प्रेसनोट दि.१३/०९/२०१८

## “महिला दक्षता समिती सदस्यांचा व नागरीकांचा सहभागाने अतिक्रमण कारवाई केले बाबत”

## कोंढवा पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी यांची कामगिरी

## कोंढवा पो स्टे पुणे शहर

---

दि.१२/९/२०१८ रोजी पुणे महानगरपालिका अतिक्रमण विभागाची कोंढवा परिसरातील आशिर्वाद चौक,सत्यानंद हॉस्पीटल,शितल पेट्रोलपंपा समोर अशा संवेदनशील ठिकाणी अतिक्रमण विभागाची नियोजीत कारवाई होती. सदरवेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून श्री.मिलिंद गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कोंढवा पोलीस ठाणे, महदेव कुंभार,पो.नि.(गुन्हे),कोंढवा पो स्टे यांनी अतिक्रमण कारवाईमध्ये कोंढवा पोलीस ठाण्यातील महिला दक्षता समितीच्या महिला सदस्या व पोलीस मित्र आणि जेष्ठ नागरीकांचा सहभाग करुन कारवाई करण्याचे नियोजन केले.

मनपाकडील झोन अधिकारी श्री.ढोकले,कनिष्ठ अभियंता, श्री.खुडे आणि वाहतूक विभाग यांचेशी समन्वय साधून,सदर परिसरातील नागरीकांना अतिक्रमा काढण्या करीता,स्थानिक जेष्ठ नागरीक व महिला दक्षता समितीकडील सदस्या यांना आवाहन करण्यास सांगून,सदर भागातील नागरीकांनी उत्फुर्तपणे स्वतः अतिक्रमणे काढली. त्यावेळी अत्यंत सौम्यपणे अतिक्रमणे कारवाई झाली आहे.

सदरवेळी कोंढवा पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी नामी शक्कल लावुन,अत्यंत कुशलतेने कारवाई केलेबाबत मनपा अधिकारी व स्थानिक नागरीकांनी कौतुक केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**